# चैत्र पालवी

“चांदोबा लपला झाडीत, आमच्या मामाच्या वाडीत...आं ... चांदोबा लपला झाडीत...ममा! मम्मा...पुढे काय गं ?”

“थांब सुरभि, मी कामात आहे...थोड्या वेळाने....”

“चांदोबा लपला झाडीत, आमच्या मामाच्या वाडीत, वाडीत होतं बाडीत, बाडीत बसलं गाडीत, गाडीत होता जिराफ, त्याला भेटलं कोण? ससा! सशाने मारले...हा! थोबाडीत!

मम्मा मम्मा कसलं मस्त नवीन गाणं झालं ना!! मज्जा !!”

“सुरभि!! थोबाडीत? काय कुठून शिकतेस असल्या गोष्टी? तुला कोणी मारतंय का? उगीच काय हे? चूप बस बघू एके ठिकाणी जरा...मला काम करू दे”

“मम्मा, तो रोहनबाबा तुला मारायचा की...थोबाडीत....”

“.....”

नेमकं काय बोलावं हे न समजून एक तप्त आंवढा गिळून मैथिली गप्प बसून राहिली... एक नुक्ती भरू लागलेली जखम, कोणी सहज खपली काढावी अशातला प्रकार....

“मी काय म्हणतोय मैथिली...स्त्री आहेस ना नक्की? मग हे इतकं साधं काम जमत नाही तुला? का मा झ्या मुलीला उपाशी ठेवून मारणार आहेस???”

“रोहन अरे…असं का करेन मी? ती माझीच मुलगी आहे ना…मग? अरे खरंच  नाही येत आहे दूध  मला…नाही माहित काय आहे ते, पुढच्या आठवड्यात आहे डॉक्टरांची  भेट, समजेल तेव्हा…”

“वाह! आणि हे तू मला आत्ता सांगते आहेस? पुढल्या आठवड्यात एक क्लायांट मिटिंग  आहे, कसं   कळत नाही तुला? मा झ्या परवानगीशिवाय कसं  हो म्हणालीस डॉक्टरला?? हद्द झाली तुझ्या मूर्खपणाची! तुमच्या खेड्यात असेच असते का?? इथे नाही चालणार हा अति शहाणपणा !!”

“अरे…आज दुपारी तर बोलले मी, तू आत्ताच आलास नां घरी, मी तरी तुला ऑफिसमध्ये फोन केला तर टीनाने सांगीतलं  तू मिटिंगमध्ये आहेस म्हणून…”

“वाह! म्हणजे  चूक  माझीच आहे तर! हो बाई मीच चुकलो ! आता काय करू, पाय धरू तुझे का? हे बघ, मलाच मी दोन थपडा मारून घेतो…” स्वत:ला मारत रोहन तस्ताच  समोर उभा होता…

अर्धवट  थकव्याने आणि जडावलेल्या देहाने, मांडीतले बाळ खाली ठेवून आता ह्याला थांबवायचे   बळ तरी कुठून आणायचे…मैथिली  घाबरून, अवघडून तशीच  बसून राहिली …मूक रडत…बाळ झाल्यावर तरी हे सगळं  थांबेल असं वाटलं होतं तिला…पण आता हे काही भलतेच घडत होते…अचानक, तिला एक जोरदार गुद्दा बसला छातीत, लेकीला कवटाळून ती मागे भेलकांडली …डोळ्यासमोर अंधारी  आली…डोक्यात तिला तिचाच आक्रोश ऐकू येत होता मात्र तोंडातून काहीच बाहेर पडलं नाही…

रोहनने अचानक तिला मारलं होतं ...तसे तो बरेच वेळा तिला मारे, तरी प्रत्येक वेळ, प्रत्येक वार हा तिला आश्चर्य चकित करायचा, विश्वासच बसायचा नाही...

काय होतंय आपल्याला, का असं होतंय ...

सुरभिच्या रडण्याने तिला भान आले...तिला शांत करायचा ती निष्फळ प्रयत्न करू लागली, भुकेने, भीतीने तिचं बाळ रडतच राहिलं...थोड्या वेळाने रोहन पुन्हा आला खोलीत आणि सुरभिला हिसकावून घेण्याचा प्रयत्न करू लागला...

मग मात्र मैथिलीच्या आत कोण रणचंडिका संचारली! शेजारी असलेली पाण्याने भरलेली काचेची बाटली तिने त्याच्या डोक्यात घातली आणि तिथेच त्याला ढकलून खोलीतून बाहेर पडली, दार कोंडून घेतलं आणि पर्स घेऊन सरळ घराबाहेर पडली...

बाहेरच्या बोचऱ्या थंडीत ती बधीरली, बाळाला अधिकाधिक लपेटून, ती अक्षरश: पळत, चालत राहिली.

नेसत्या वस्त्रानिशी ती घराबाहेर पडली तर होती, मात्र जाणार कुठे, करणार काय, काहीच पत्ता नव्हता तिला...वाट फुटेल तिथे ती चालत राहिली . पदोपदी भीतीने मागे वळून बघत होती, रोहन तर मागावर आलेला नाही म्हणून...

एक एक प्रश्न हिंस्त्र श्वापदांसारखे तिच्या टाचांपाशी गुरगुरू लागले... वस्तीपासून इतक्या दूरवर का घर घेतलं होतं ह्याने?

का असे अचानक येऊन होकार दिला होता तिला?

औरांगाबाद काही अगदीच खेडेगाव नव्हतं. ती स्वतः  एम एस्सी झुलॉजी  झालेली होती, पुढे रिसर्च  करता येईल, तशा संधी तिथे खूप मिळतील, असे सगळे बघून तिने  त्याला होकार दिला  होता. इथे येऊन मात्र हा देखणा सुशिक्षित राजकुमार!? राजकुमार कसला सैतान निघाला!

वाट्टोळे वाट्टोळे केले तिचे ...

लग्नानंतर पहिल्यांदा अमेरिकेला ती आली  त्यावेळी, एयरपोर्टवर यायला  त्याने जवळ जवळ  पाच तास उशीर केला. ती इतकी गोंधळून गेली होती... भांबावून गेली होती.. .मग घरी जाताना  इतका मधाळ बोलला की तिला उगीच ह्याच्यावर चिडलो असेच वाटून गेले...

नवीन संसार, नवीन देश, मैथिली तिथे रूळू पाहत होती, मनापासून रूजू पाहत होती!

मात्र घरी पोचल्याच्या  एका आठवड्यातच डिशवॉशरमध्ये एक काचेचा ग्लास फुटला तिच्याकडून, तिने  सगळे आवरले, तरी बोलता बोलता अचानक चिडला, आपणहुन  ओरडा आरडा करू लागला...ती समजावायला  गेली तर एक सणसणीत थोबाडीत लगावली तिला...काय झालं  ते समजायच्या  आत तिचा हात  पिरगाळून तिच्या पाठीमागे धरला आणि किंचाळत, ओरडत विचारलं तिला , “परत करशील असं ? करशील ?”

“रोहन सोड, हात दुखतोय माझा, यू आर हर्टींग मी ....”
“ए बये, गप! इथे माझा इतका आवडीचा ग्लास फोडलास ना, मग शिक्षा  नको तुला?? यू हर्ट मी , यू बिच...”

“माईंड युवर लँग्वेज...मी बायको आहे तुझी...सोड!!”

तिचा आवाज ऐकून, जोरात  समोरच्या टेबलवर तिला  ढकलून देत हा तसाच उभा...मग्रूर आणि भावना शून्य नजरेने तिच्याकडे बघत.

आपल्याला आत्ता नेमकं  काय झालं, आपल्याला कोणी तरी चक्क मारलं???आपल्या नवऱ्याने?? मैथिलीला  पटपट विचारच करता येईना...इतक्या वर्षांत  कधी आई बाबांनी  एकदाही आवाज  चढवला नव्हता, कधी अवाक्षर उच्चारले नव्हते, मार तर लांब राहिला.  आणि  आता लग्न होऊन इथे आल्यावर एका आठवड्यात  हे काय झालं ?? ग्लास तुटला  म्हणून? इतकं काय चुकलं  माझं ?

ऑफिस मध्ये काही टेन्शन असेल का? मनाविरूद्ध  लग्न झालं होतं  का? ह्यात तीचं काय चुकलं? तिला कळेच ना.

त्या रात्री रोहनने फूलं  आणली,चॉकलेट आणली, तिला खूपदा  सॉरी  म्हणाला आणि  काही थातूरमातूर कारण सांगून परत असे नाही करणार, मला माफ कर असेही म्हणाला. एवढं सगळं होऊन, तिला पुरते भोगून, तिच्याच कुशीत एका निष्पाप  बाळासारखा गाढ झोपून गेला...

होत असावं नवरा बायकोत असं, कदाचित असाच हक्क गाजवत असावेत, असा काहीसा संकोचपूर्ण विचार  मनात घोळवत मैथिली  झोपून गेली.

एरवी असा एवढा देखणा नवरा आपल्याला मिळेल  असे तिच्या स्वप्नात  देखील आले नव्हते.  उंच पुरा, गोरा, पिंगट डोळ्यांचा. एकाच गालावर हलकी खळी आणि डोळ्यांना शोभतील असे पिंगट केस. भारदस्त, कमावलेले पीळदार शरीर  आणि उच्च शिक्षित राजबिंडा नवरा!  एका महिन्यात लग्न ठरून पार पडले होते...सासू सासरे नव्हते, मुलगा आत्याकडे

मोठा झालेला, आता MBA करून अमेरिकेत नोकरीला होता. उत्तम छायाचित्र काढायचा, फोटोग्राफीची प्रदर्शनं देखील भरवली होती म्हणे बोस्टनला! त्याची एकच अट होती म्हणे, मुलगी खूप शिकायला तयार हवी...लग्नानंतर सुद्धा शिकायला हवे...सगळेच अगदी मनासारखे होते, खोट काढायला जागाच नव्हती...मुग्धा, मैथिलीची अगदी मैत्रीण, मात्र तिला म्हणाली होती, “मिठू यार, इट्स ऑल टू गुड टू बी टू...मी आहे तुझ्यासाठी कायम, काहीही, कधीही लागलं तर हक्काने सांग...”

ती इथे आली बोस्टनला तेव्हा आधी तीन एक महिन्यातून एकदा, मग महिन्या आड आणि मग दर आठवड्यातून एकदा तरी रोहन मधला सैतान जागा होऊ लागला. आधी काय तर म्हणे किती काकूबाईसारखी राहतेस, नीट कपडे घाल, मग काय तर मेकअप कर, मग काय तर म्हणे जरा फिट हो, मग तुला काही अक्कल नाही, मग काय तर उलट उत्तरं देते...एक ना अनेक अर्थहीन कारणांवरून हा सतत तिला टोचनू बोले नाही तर मग फार भडकला तर हात, बेल्ट, बूट, काहीही हाताला लागेल त्याने मारहाण करी.

कोणाच्याही घरी फोन करायचा तरी ह्याच्या फोनवरून आणि ह्याच्या समोर बोलायला लागे. आई बाबांशी इतका लडिवाळ संवाद करे की शंका यावी हा तोच आहे ना म्हणून...फेसबुकवर दर महिन्याला कुठे कुठे गेल्याचे फोटो ठरलेलेच होते! तिचे फोटो, कायम नटून थटून काढलेले...डोळ्यावर सतत गॉगल्स... आणि हा शेजारी, तिला करकचून उभा असलेला...उत्तम सुरु होतं त्यांचं हे त्याने ठरवून ठसवलेलं सगळ्यांच्या मनावर...

मैथिलीची मात्र गोची, इतका कोंडमारा होत असे, असह्य वेदना आणि वर हे नाटक!

रोहन घरातून रोज निघायचा  तेच  घराला बाहेरून कुलूप लावून,  वायफाय राउटर सोबत घेऊन आणि केबल बंद करून.  त्याचा  फोन आणि तिचा फोन लिंक केलेला...हिच्या क्रेडिट  कार्डचा  सगळा हिशोब  त्याच्या फोनवर मेसेज...घुसमट व्हायची तिची प्रचंड. एखाद  दिवस वेड लागेल, नाहीतर डोकं फुटून जाईल असेच वाटू लागले तिला.

कुठे तरी आतून काही निखळून  पडलं तिच्यातलं, जगण्याची जी उर्मी  असते, लालसा असते, ती पुरती करपून गेली होती...डोळ्यातलं तेज केव्हाच  विझून गेलं  होतं आणि ह्या सगळ्याचा अंत  कुठे कसा हेच कळेना...

तू भीड ना त्याला, थांबाव, हात धर, तू काही मार त्याला, पोलीसला फोन कर...अशा सगळ्या सूचना  तिला सतत मनात ऐकू येत असत, मुग्धाच्या आवाजात. मात्र ती इतकी भेदरून गेली होती, आतून जणू गारठून  गेले होते सगळे प्रतिकार. ती दिवसच्या दिवस शून्यात बघत राही, कधी होईल सगळं नीट, कसे बदलेल तिचे वास्तव. प्रयत्न ती पुष्कळ करी,  कधी  त्याच्या आवडीचे जेवण बनवी, तयार होऊन बसे, त्याची वाट बघत...
मात्र  आल्या  आल्या अर्वाच्य शब्दात तो तिला  सुनवी, बाजारबसवी आहेस का, संध्याकाळी एवढे नटून बसलीस ते!

म्हणून न करावं  काही तर घरच्यांचा उद्धार ठरलेला, वर खेडेगावातून आलेली म्हणून हिणवलं तिला की  ह्याचे पोट भरे...दररोजचा दिवस काय ताट वाढणार समोर तिच्या ह्याचा तिला कधीच पत्ता नसे! मार, मानहानि मात्र रोज होती मेनूवर!

लिव्हिंग हेल...अशात दिवस  गेले तिला, कारण निरोध ह्याला निषिद्ध होता जणू! आता तरी जपून  वागवेल हा आपल्याला, कोणाला तरी घरी  बोलावून

घेता येईल असे वाटले, तर नाही, हा म्हणे स्वतःच तिची काळजी घेणार होता, इतर अमेरिकन लोकांसारखा! कोणाला येऊ दिले नाही त्याने...प्रत्येक डॉक्टर व्हिसिटमध्ये ती टक लावून बाथरूमच्या दारामागचा तो संदेश वाची... 'स्पिक टू अस... इफ यू आर अ व्हिक्टीम ऑफ डोमेस्टिक अब्युज , व्हायोलेंस , वी विल हेल्प यू, स्पीक अप अँड बी सेफ. कॉल ९११ ऑर द नंबर बिलो ऑर स्पीक टू युवर नर्स प्रॅक्टिशनर ऑर डॉक्टर.'

संपूर्ण नऊ महिन्यात तिचे एकदाही धाडस झाले नाही...हातात फोन धरला तरी कापरं भरायचे तिला, मग वाटायचं ह्या पोटातल्या जीवाचा तरी काय दोष, कदाचित बाळाच्या येण्याने, त्याला बघून सुधारेल रोहन. नुसती भोळी आशा, दुसरे होतेच काय तिच्या हातात.

मुलगी झाली तिला! सुरभि रोहन! इतकेच नाव त्याने परस्पर देऊन टाकले त्या तान्हुलीला!

मैथिलीला ह्याचा आनंद वाटून घ्यायचा का दुःख हेच उमगेना! असाच एखाद जोडीदार हिच्या वाट्याला आला तर! तिला पुढे विचारच करवेना! मग तो दिवस उजाडला, दोन महिने झाले तरी तिला म्हणावे तसे दूध येत नव्हते, ती इतकी अशक्त होती, तणावात होती सतत की तिला काही समजत नव्हते, त्यात पहिलीच वेळ, आई असून जवळ नाही. सगळीच पंचायत! ऑफिसमधून हा येईपर्यंत बाळात रमली तरी घरकामे होतीच, ओली बाळंतीण ती तरी जीवाच्या आकांताने कामं उरकत राही...

त्या दिवशी तिला असेच घालून पाडून बोलल्यानंतर त्याने तिला मारहाण केली तरी ती तशी शांत होती, मात्र दोन महिन्याच्या इवल्या सुरभिवर ह्याने हात टाकायचा प्रयत्न केला आणि मैथिली आतून उसळली! रणचंडिका

झाली! घरातून नेसत्या वस्त्रानिशी  इवलुश्या सुरभिला घेऊन बाहेर पडली त्या बोचऱ्या थंडीत!
काही वेळ चालून गेल्यावर शरीरातले  रक्त गोठून जाईल  असे वाटू लागले तिला. रस्ता सुनसान, हातात फक्त एक पर्स, त्यात ना पासपोर्ट  ना फारसे पैसे, दुधासाठी सुद्धा पैसे नाहीत, तरी त्याची तमा न बाळगता मैथिली चालतच राहिली! इतक्या दिवसांचा राग, अपमान आणि तिरस्कार जणू तिला रेटत होता, का कदाचित तिच्यातली आई तिला तिच्या पिलासाठी बळ देत होती!
दुरून येणारी एक कार तिच्या अगदी जवळ येऊन थांबली.  त्यातून एक वृद्ध जोडपं डोकावलं,  तिथे ती नेमकं काय बोलली कोणास ठाऊक! तिला ती संध्याकाळ आठवतच नाही... पुढे मग पोलीस, कायदेशीर तक्रार,  रोहन विरुद्ध साक्ष आणि गुन्हा दाखल करणे, आणि त्याचे अधिक अधिक विखारी आणि विकृत होत जाणारे वर्तन! हीन पातळीला पोचून त्याने कोर्टात आणि इतरत्र तिचे केलेले अपमान, खोटे आरोप, सगळा, सगळा भयंकर प्रकार होता! त्याच्या नातलगांचे  पराकोटीचे अलिप्त वर्तन, सगळेच क्लेशकारी होते! कितीतरी  वेळा ती पुरती कोलमडून पडेल असेच वाटत राहिले तिला...ह्यात नेमकं  कोणाचे चुकले ह्याचा विचार  करून तिचे डोके  चढायचे ...
मायग्रेनचा त्रास सुरु झाला,  अकाली केस पिकू लागले...भकास झाली ती पार; तरी सुरभिसाठी ती लढत राहिली!
कालांतराने तिचा आणि सुरभिचा पासपोर्ट  पुन्हा हाती आला. तिला खूप मदत झाली  तिथल्या सगळ्या सेवा भावी संस्थांची...आई बाबांना बोलावून घेतलं तिने शेवटी आणि सगळे मिळून  घरी गेले औरंगाबादला.

ह्यात जवळ जवळ वर्ष सरलं, सुरभिच्या बाललीला बघायच्या राहुनच गेल्या! करत करत ती आता साडेतीन वर्षांची  झाली होती...मैथिलीचं  बाळ आता सुरक्षित होतं! तिच्यापाशी  होतं!
मैथिली  मुग्धाच्या मदतीने, प्राध्यापक म्हणून कॉलेजमध्ये  नोकरी करत होती  आणि  पुन्हा एकदा नव्याने स्वतःचे  असे असलेपण घडवू पाहत होती. अशातच  एका संध्याकाळी सुरभिने ते नवेच गाणे काय तयार केले आणि एक मोठीच खपली निघाली मैथिलीच्या जखमेवरची. कोणी तरी आपल्या अस्तित्वावर  असा थेट हल्ला करू शकतोच कसा ? ज्याच्यात आपल्याला पूर्णतः  उध्वस्त करायची क्षमता  आहे, अशा कोण्या निकटवर्ती  व्यक्तीने, ठरवून आपल्याला उध्वस्त करावं  का? मग आता? नव्याने कुठे शोधावं प्रेम, कोणाला  सोपवावा तो ठेवा?

मैथिलीच्या पुढ्यातले प्रश्न अजून संपले नव्हते मात्र त्यांची पकड आता तितकी घट्ट नव्हती, मनावर.

आधी सुरभिला घडवायचे होते...

“ए पिल्ला, साांगू का पुढचे शब्द गाण्याचे? ऐक ना मनूली... असं करू या, तो व्हिडियो बघूया दोघी? ये बघू आपण मम्माच्या मोबाईल वर...”

“चांदोबा लपला झाडीत, आमच्या मामाच्या वाडीत. मामाने दिली  हो साखर साय, चांदोबाला फुटले पाय....”

- प्राजक्ता पाडगांवकर